248

ISSN 2230-7745

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

## मराठी समाजशास्त्र परिषद

वर्ष ३६ वे, अंक २३ वा, डिसेंबर, २०१८.

मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

LECTURER
ART'S COMM. & SCI. COLLEGE
Shankarnagar, Tq, Biloli
Dist. Nanded.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेखाचे शिर्षक | लेखक | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १. | अल्पसंख्याकांची अस्मिता: तात्वीक भ्रम आणि व्यावहारिक संदर्भ | जगन कराडे | ...१ |
| २. | नैसर्गिक संसाधन आणि सामाजिक न्याय... | संपत काळे | ...६ |
| ३. | उत्तर जागतिकीकरणातील उपेक्षीतांचे संघटनीकरण | धनराज पाटील | ...११ |
| ४. | सायबर स्त्रीवाद | प्रविण घोडेस्वार | ...१६ |
| ५. | आदिवासी समाज व कुमारीमातांची समस्या | श्रीराम खाडे | ...१९ |
| ६. | शासनाचे विनाअनुदान धोरण व मराठवाड्यातील उच्च शिक्षण | हनुमंत मिसाळ | ...२४ |
| ७. | महिला सक्षमीकरणातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान | ज्योती पोटे | ...२८ |
| ८. | देवदासी प्रथा: एक समाजशास्त्रीय चिंतन | जया लाडे | ...३१ |
| ९. | भारतीय महिलांचा राजकीय सहभाग | प्रविण मुधोळकर | ...३६ |
| १०. | भटक्या विमुक्त समाजातील वर्तमान समस्या व परिवर्तन | दिपक पवार | ...४१ |
| ११. | जागतिक तापमान वाढीचे संभाव्य धोके व उपाययोजना | बाळकृष्ण रामटेके | ...४४ |
| १२. | बचत गटाच्या संकल्पनेतील महिला सशक्तीकरण | गणेश बहादे | ...४७ |
| १३. | समाजशास्त्र : समस्या व आव्हाने | कमलकिशोर इंगोले | ...४९ |
| १४. | जागतिकीकरणाचा आदिवासी समाज जीवनावरील परिणाम | मनोहर येरकलवार | ...५२ |
| १५. | सेझ जमीन अधिग्रहण विरोधी शेतकऱ्यांचा संघर्ष | मंजुषा नळगीरकर | ...५६ |
| १६. | जेष्ठ नागरिकाश्रमात राहणाऱ्या जेष्ठ नागरिकांची धार्मिक स्थिती | राजेंद्र बगाटे | ...६१ |
| १७. | भारतीय राज्यघटनेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान | के. एस. काळे | ...६७ |
| १८. | महाराष्ट्रातील दुष्काळ निवारण : एक काळाची गरज | सुरेश धनवडे | ...७१ |
| १९. | सरोगसी माता | विलास पवार | ...७४ |
| २०. | महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाची गती आणि स्थिती | नारायण कांबळे | ...७७ |
| २१. | आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबाना भेडसावणाऱ्या समस्या | रामेश्वर मोरे | ...८३ |
| २२. | सुशिक्षित बेरोजगारी आणि गुन्हेगारी | किशोर राऊत | ...८५ |
| २३. | महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचे बदलते विविध पैलू | सुधा खडके | ...८८ |
| २४. | प्रसार माध्यम आणि ग्रामीण युवकांचे वर्तन | एस. के. राठोड | ...९१ |
| २५. | महिला सबलीकरण | हर्षला सुर्यवंशी | ...९६ |
| २६. | लिंगभाव विषमता : माता, बाल कुपोषण | भगवान मनाळ | ...९८ |
| २७. | लोकसंख्या विस्फोट : एक सामाजिक समस्या | अशोक सालोटकर | ...१०२ |
| २८. | जेष्ठांच्या समस्या व जेष्ठ नागरिक चळवळीची भूमीका | रविंद्र विखार | ...१०४ |
| २९. | काव्यसृष्टीत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंचे योगदान | संतोष मेंडेकर | ...१०६ |
| ३०. | शिक्षणाच्या खाजगीकरणाचा भिल्ल जमातीवरील प्रभाव | श्रीनिवास पिलगुलवार | ...१०८ |
| ३१. | जातीभेदाचे मूलगामी चिंतन (ग्रंथ समिक्षण) | प्रियदर्शन भवरे | ...११४ |
| ३२. | २८ व्या मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशनाचा अहवाल | अरूण पौडमल | ...११८ |


LECTURER
ART'S COMM. & SCI. COLLEGE
Shankarnagar, Tq. Biloli
Dist. Nanded.

समाजशास्त्र संशोधन पत्रिका, वर्ष ३६ वे, अंक २३ वा, डिसेंबर, २०१८. ISSN 2230-7745

# 'महाराष्ट्रातील दुष्काळ निवारण: एक काळाची गरज'

डॉ. सुरेश धनवडे, कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय शंकरनगर, ता. बिलोली जि. नांदेड. मो. ९८९०४१९८५०

प्रस्तावना: महाराष्ट्रातील दुष्काळ ही समस्या दिवसेंदिवस तीव्र बनत चालली आहे. दुष्काळ समस्या ही संकल्पना आंतरविद्याशाखीय आहे, हे जरी खरे असले तरी त्याचा परीणाम हा सबंध समाजावर पडत असतो. दिवसेंदिवस पाण्याचे घटते प्रमाण ही एक चिंताजनक समस्या भेडसावत आहे, व त्यामध्ये वाढणारी भरमसाठ लोकसंख्यावाढ अशा स्थितीमध्ये भारतीय समाज वाटचाल करत आहे. दुष्काळ हा 'ओला' व 'कोरडा' अशा दोन प्रकारात विभागला जातो. शेतकऱ्यांच्या कोणत्याही समस्येवरील एकमेव आणि अंतिम उत्तर म्हणजे 'पॅकेज' जाहीर केले तरी, त्याचे पुढे नेमके काय होते; हे तपासण्याचे काम कधी झालेच नाही. केवळ दिखाऊ उपायांमुळे प्रश्न सुटत नाहीत. त्यासाठी दीर्घकालीन योजना आखण्याची आवश्यकता असते, हे लक्षात घेतले पाहिजे. यापूर्वीच्या सरकारांनी पॅकेजवर पॅकेज देऊन ही सवय लावली आहे. त्यामुळे दुष्काळ असो, की शेतकऱ्यांच्या आत्महत्या. त्यावरील हमखास उत्तर संबंधितांसाठी विशेष आर्थिक तरतूद जाहिर करणे, हेच असू शकते. असे सगळ्यांना वाटत आले आहे.

भारतीय समाजामध्ये ज्या विविध समस्या आहेत, त्यापैकी दुष्काळ ही एक मानव निर्मित समस्या आहे. प्रचलित समस्येवर विविध विचारवंतांनी विविधांगी विचार मांडलेले आहे. यापैकी उपलब्ध व विषयास अधिक समर्पक अशाच आशयाचा आढावा प्रस्तुत निबंधात घेतला आहे. या अनुषंगाने उपर्यूक्त शिर्षकावरुन प्रस्तूत विवेचन पुढील उद्दिष्टांना अनुसरुन केले आहे.

१. 'दुष्काळ' संकल्पनेचे समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून आकलन करणे.
२. 'जलनियोजन' व 'दुष्काळ' यामधील परस्पर संबंध जाणून घेणे.

संशोधनाची उद्दिष्टे समोर ठेवून अध्ययनात गृहितकृत्ये पुढिलप्रमाणे मांडलेली आहेत.

१. 'जलसाक्षरता' व 'जलनियोजनाच्या' अभावामुळे दुष्काळ मानव निर्मित समस्या आहे.
२. मानवाचे पर्यावरणामध्ये अमर्याद हस्तक्षेप होत आहे.
३. 'निसर्ग' हा मानवाचा अविभाज्य घटक आहे.

**शोधनिबंधाचे महत्व:** प्रस्तुत शोधनिबंधाचे मुख्य उद्दिष्ट दुष्काळ संकल्पनेचे समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अध्ययन करणे. उत्तरआधुनिकतेत दुष्काळाचे परिणाम जाणणे व त्यावरील उपाययोजनांची अमंलबजावणी करणे. निसर्ग आणि मानवी समाजाच्या अभ्यासाव्दारे मानवी समाजाला नैसर्गिक वातावरण किती महत्वाचे आहे? हे आपल्याला अभ्यासाव्दारे लक्षात येते. सदरील अभ्यासाचा उपयोग सामान्य अभ्यासक, शासन यंत्रणा, पर्यावरण चळवळीतील कार्यकर्ते व अभ्यासक इत्यादींना होऊ शकेल म्हणून हा विषय महत्वाचा आहे.

**संशोधन पध्दती :** प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरण्यात आला आहे. तसेच शोधनिबंधात दुय्यम स्त्रोतांचा उपयोग, नियतकालीके, शासकीय लेख, वर्तमानपत्रे, वैचारीक लेख, संकेत स्थळे इत्यादींचा वापर करण्यात आला आहे. या अनुषंगाने दुय्यम सामुग्री पध्दतीव्दारे दुष्काळ संकल्पनेचे समाजशास्त्रीय अध्ययन वैज्ञानिक दृष्टीकोनातून स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. 'जलनियोजन' व 'दुष्काळ' या संकल्पना विविध शास्त्रामध्ये अभ्यासल्या जात असल्या तरी, ती आंतरविद्याशाखीय संकल्पना आहे. प्रस्तुत शोधनिबंधाचे वस्तुनिष्ठ विश्लेषण खालीलप्रमाणे केले आहे.

महाराष्ट्रातील दुष्काळाला अनेक कारणे आहेत. पण कारणांबरोबरच उपायही आहेत. उपाय हाताशी असताना इकडे तिकडे धावाधाव करण्याचीही आवश्यकता नाही. 'पाणी' व 'सिंचन' या घटकांचा मागोवा घेण्यासाठी राज्य सरकारनेच तेरा वर्षापूर्वी जल सिंचन आयोगाची स्थापना केली होती. त्यात पाण्याचे 'नियोजन' व 'व्यवस्थापन' कशा पध्दतीनं करायचे याबाबत स्पष्ट शिफारशी आहेत. मात्र आता या उपायांकडे आपण ढुंकूनही पाहिले नाही आणि आताच्या दुष्काळात करायचं काय? असे म्हणत भांबावलेलो आहोत. याचाच अर्थ, आपण दुष्काळाला आवतन दिले होते.[१]

महाराष्ट्राने आतापर्यंत दोन सिंचन आयोग पाहिले. १९६२ साली पहिल्या स. गा. बर्वे आयोगाचा अहवाल आला पुढच्या काळात पाणीवापर बदलाच्या काळात पुढे डॉ. माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र 'जल' व 'सिंचन' आयोग नेमण्यात आला. त्याचा अहवाल आयोगाने ३० सप्टेंबर १९९९ रोजी सरकारला सादर केला. चितळे आयोगाने विविध क्षेत्रांशी निगडित एकूण ३२९ शिफारशी सादर केल्या. त्यापैकी पाण्याची उपलब्धता, टंचाई प्रदेश, त्यातील जलनियोजन, पिकांची रचना,



LECTURER
ART'S COMM. & SCI. COLLEGE
Shankarnagar, Tq. Biloli
Dist. Nanded.

उद्योगधंद्यांचे नियोजन आणि एकूणच दुष्काळाला कारणीभूत ठरणाऱ्या ठळक शिफारशींवर तेरा वर्षानंतर नेमकी काय अंमलबजावणी झाली याचा मागोवा घेतला तर पुढे येणारे चित्र अगदीच विदारक आहे. याचबरोबर राज्यातील सहकारी साखर कारखान्यांबाबत माधराव गोडबोले समितीनेही १९९९ साली कोणत्या क्षेत्रात साखर कारखाने काढू नयेत? याच्या सूचना केल्या आहेत. या शिफारशींबाबतही पुढे फार काही घडले नाही.

महाराष्ट्रातील गत पाच—सहा दशकातील पाटबंधारे प्रकल्प, पाणी नियोजन व धरणांचा परामर्श घेतल्यास हे स्पष्ट जाणवते की, राज्यातील पाणी प्रकल्प उभारणीची दिशा पूर्णत: भरकटलेली व भ्रष्टाचारात अडकेलेली आहे. यासाठी आता 'जलनियोजन' व धोरणाच्या प्रचलित प्रभावशाली यांत्रिकी—अभियांत्रिकी दृष्टीकोनाला सोडचिठ्ठी देऊन व श्रमशक्तीव्दारे ते अंमलात आणल्यास दुष्काळावर मात करता येईल.[२]

उपरोक्त पार्श्वभूमी व परिप्रेक्ष्य समोर ठेवून महाराष्ट्रातील गत पाच सहा दशकातील पाटबंधारे प्रकल्प, पाणी नियोजन व धोरणांचा परामर्श घेतल्यास, हे स्पष्ट जाणवते की, राज्यातील पाणी प्रकल्प उभारणीची दिशा पूर्ण: भरकटलेली व भ्रष्टाचारात (सिंचन घोटाळा) अडकलेली आहे. महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक धरणे बांधणारे राज्य आहे. अब्जावधी रुपये त्यावर खर्ची झाले आहेत. महाराष्ट्राची आजची सिंचन व्यवस्था देशात सर्वाधिक आजारी, अकार्यक्षम व भ्रष्ट असून महाराष्ट्रात पाटपाण्याने ओलित होणारे क्षेत्र एकूण लागवड क्षेत्राच्या जेमतेम सहा टक्के एवढेच आहे. राज्यात सिंचित क्षेत्राची अकडेवारी अठरा टक्के असल्याचे वारंवार सांगितले जाते. त्यातील दोनतृतीयांश भूजलावर आधारित आहे. विहिरी व वीजपंपाव्दारे ओलित केले जाणारे हे क्षेत्र शेतकऱ्यांनी स्वत: प्रयत्न व कर्ज घेऊन निर्माण केले आहे. यंदा पाऊस कमीच होता, तो वेळेवर पडलाच नाही आणि अखेर थोडाफार दिलासा देण्यापुरताच झाला. अवर्षणाशी आपण मानवी—सरकारी प्रयत्नांनी दोन हात करु शकतो, पण प्रयत्नच थिटे पडतात तिथे दुष्काळ सुरु होतो.[३]

निसर्ग अवर्षण देतो—दुष्काळ नाही. दर चार—पाच वर्षांनी आपल्या देशात पाऊस कमी पडतो. त्यामुळे अन्नधान्य उत्पादन कमी होते, पिण्याच्या पाण्याचे संकट येते, माणूस व पशू—पक्ष्यांच्या जगण्यावर संकट येते, शेतीशी निगडित असलेल्या प्रत्येक वर्गात त्यामुळे हाहाकार उडतो, असा याचा भयंकर अर्थ नाही. ही परिस्थिती अवर्षणामुळे नाही तर समाज व सरकार अवर्षणास तोंड देण्यास सुसज्ज नसतात, तेव्हा निर्माण होते. परिणामी अस्मानी व सुलतानी संकटातून भयानक दुष्काळ अनुभवाला येतो. दुष्काळाच्या आधी समाजाच्या पातळीवर विचारांचा, आठवणींचा व भावनांचा दुष्काळ पडतो. त्यामुळे अवर्षण एकटे येत नाही ते दुष्काळाला घेऊन येते, असे म्हटले जाते. परत या गोष्टींची पुन्हा आठवण करुन देण्याची गरज आहे.

प्रत्येक घनमीटर पाण्याच्या उत्पादन मूल्यानूसार शेतीला, उद्योगाला, पिण्यासाठी किती? याचे नियोजन करावे लागेल. हे नियोजन सगळ्या उपखोऱ्यात सारखे राहणार नाही. यामध्ये पाण्याचा फेरवापर करण्यासाठी जर आपल्याला वीस रुपये खर्च येत असेल आणि त्या पाण्याचे मूल्यात रुपांतर हे पन्नास रुपयांपर्यंत होणार असेल, तर या दृष्टीने नियोजन व्हायला हवे. यामध्ये उर्जेचाही विचार करावा लागेल.[४]

पाण्याचे नियोजन करताना प्रत्येक पाणलोट क्षेत्राचे वेगळे गणित बसवावे लागणार आहे. शेती, उद्योग यांच्या पाण्याच्या गरजेची सांगड कशी घालायची? या सर्वंकष विचार करण्यासाठी एका मंचाची गरज आहे. सरासरी पाणी, त्याचे नियोजन, दोलायमानतेमुळे येणारी तूट, अशा दोन्ही पातळ्यांवर विचार करावा लागेल. ही तूट कशी येते? हे आपण अजूनही लोकांना समजावू शकलो नाही. भूजलातील तूट, पावसाची तूट, प्रवाहातील तूट अशा चिकित्सक पध्दतीने आपल्याला यापरिस्थितीचा विचार करावा लागेल. आपल्याकडे ६० ते ८० टक्के पाणी बाष्पीभवनामूळे वाया जाते. मात्र, त्याबाबतही आपल्याकडे अजून पुरेशी जागरुकता नाही. काळानुसार पाण्याचे आणि माणसाचे नाते बदलत आहे. ते लक्षात घेऊन पाण्याचा समन्वित व काटकसरीने विचार करणारा समाज निर्माण करणे आणि त्यांच्यात सहयोग कसा राहिल, हे आपले आव्हान असेल. यावरच आपले भवितव्य अवलंबून आहे. दुष्काळ आपल्यासाठी नविन नाही, पण त्याला तोंड देण्यासाठी आपण आतापर्यंत काय नियोजन केलं? आणि त्यासाठी किती सामाजिक मानसिकता निर्माण केली? हे तपासून पाहण्याची गरज आहे. या संदर्भात १९०० सालच्या मे महिन्यातील केसरी मध्ये लोकमान्य टिळकांनी एका लेखात म्हटले होते, आपल्याकडे दुष्काळी स्थिती नेहमीच येते. पण दुष्काळावर मात करण्यासाठी आपण काय नियोजन केले? यावर आपले भविष्य अवलंबून आहे. याची आज पुन्हा एकदा आठवण करुन द्यावीशी वाटते.

आताचा दुष्काळ हा २०१४ ची राजकीय दिशा ठरवणारा आहे. कारण आपण बारीक बारीक गोष्टींवर कधीच प्रभावीपणे उपाययोजना करु शकलेलो नाही. डोक्याला जखम झाली तर आपण अंगठ्याला चिंधी गुंडाळत बसलो. आता त्याचा स्फोट होईल. मे महिन्यात कदाचित राज्यकर्त्यांना कुठे जायचे ठरले तर विरोधी पक्षाला सोबत घेऊन जावे लागेल. पाण्याचे टॅंकर पुढे जाऊ लागले. तर तहानलेला गाव ते पुढे जाऊ देणार नाही. त्यासाठी प्रत्येक टॅंकरवर बंदूकधारी आणि गावात एसआरपी आणून ठेवावी लागेल.[५]

दुष्काळ रोखण्यासाठी दोनशे मिलिमीटर पाउस खूप आहे. तुमचे नियोजनाचे गणित काय आहे? हे



LECTURER
ART'S COMM. & SCI. COLLEGE
Shankarnagar, Tq, Biloli
Dist. Nanded.

समाजशास्त्र संशोधन पत्रिका, वर्ष ३६ वे, अंक २३ वा, डिसेंबर, २०१८. ISSN 2230-7745

महत्वाचे आहे. म्हणून पाण्याचा ताळेबंद येणे भविष्यकाळात गरजेचे आहे.

राज्यभर फिरुन दुष्काळ समजून घेताना एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात आली ज्या गावाच्या शिवारात उस होता त्याच गावात टॅंकरही होता. सोलापूर जिल्ह्यात उसाचे क्षेत्र सर्वाधिक आहे. जवळपास ३० कारखाने आहेत. येथेच जास्तीत जास्त विहिरी आहेत. शेतीसाठी विजेचा सर्वाधिक वापर, टॅंकर, जनावरांच्या छावण्याही सोलापूरमध्येच आहेत.[६]

पर्जन्यछायेच्या प्रदेशात पाऊस कमी असल्याने तेथे पाणी जमिनीवरुन वाहत नाही म्हणूनच उजनी, घोड, जायकवाडी, गिरना हे पाणीसाठे रिकामे आहेत. हे पाणीसाठे रिकामे आहेत. अशा परिस्थितीतही जमिनीत मुरलेल्या पाण्याचा पिण्यासाठी वापर करता येऊ शकतो. लातूरसारख्या ठिकाणी बाराशे ते चौदाशे फूट खोल बोअर खणून ते पाणी ऊसासाठी ऊपसले जाते. अशा प्रकारे जमिनीची चाळण केली जात असताना त्यावर कोणताही प्रतिबंध घालण्यास मात्र हतबलता दाखवली जाते. भूजलाचा कायदाही राष्टपतींच्या सहीसाठी थांबला आहे. ऊसही गरजेचा आहे. त्यामुळे त्याला विरोध करुन चालणार नाही. मात्र तो जिथे पाण्याची उपलब्धता आहे तिथे वाढवला जावा. साखर कारखाने क्रमाक्रमाने पश्चिम आणि पूर्व भागांत स्थलांतरित करणे शक्य आहे. याच राज्यातील माणसे आफ्रिका खंडात जाऊन तिथे हजारो हेक्टर जमीन ९९ वर्षाच्या लीजने घेऊन तिथे ऊसाचे उत्पादन घेतात. मग कोकण आणि विदर्भात उसाचे उत्पादन घ्यायला लोक का तयार होणार नाहित? दुष्काळ हे मानवनिर्मित संकट आहे. त्याचे मूळ आपण समजून घेतले नाही तर यापुढेही असेच घडत राहिल.

**निष्कर्ष:** आजघडीला आपल्या देशाची लोकसंख्या १३४ कोटीच्या वर पोहोंचली आहे. हिच मोठी समस्या आहे. जगाच्या एकूण भूभागापैकी २.४ टक्के एवढ्या भूभागावर मोठा जनसागर वास्तव्याला आहे. म्हणूण येत्या काळात नव्हे तर, आजघडीला भारतीय लोकसंख्येवर कायद्याने आळा घालणे अगत्याचे आहे. प्रत्येक समस्येचे मूळ कारण लोकसंख्येत दिसत आहे. बहुतांशी लोकसंख्या ही ग्रामीण भागात वास्तव्याला आहे. तीथे आजघडीला पाण्याचे स्त्रोत कमी होतांना दिसत आहे. शुध्द तर सोडाच अशुध्द पाणी दूरापास्त होत चाललेलं आहे. एवढं होत असतानाही समाज काही गांभीर्याने या समस्येकडे पाहताना दिसत नाही. स्वातंत्र्यापासून आजपर्यंत पाण्याचा अमर्याद वापर झालेला आहे. त्याचेच परिणाम आपण सर्वजण भोगत आहोत. भारतात पाण्याचे योग्य धोरण ठरविण्यासाठी जल आयोग निर्माण केलेला आहे, तसेच काही मार्गदर्शक तत्वे दिली आहेत. तरीदेखील पाण्याचे योग्य नियोजन होताना दिसत नाही. पहिल्यांदा पाण्याचा वापर पिण्यासाठी नंतर शेतीसाठी व शिल्लक असणार तेंव्हा औद्योगिकरणासाठी वापर करावा. परंतु आपल्या महाराष्ट्रात असे झाले नाही. म्हणून जलनियोजन ही काळाची गरज आहे. याशिवाय इतरही बाबींचा विचार केला तर पाण्यासंबंधी नियोजन होऊ शकेल.

जगातल्या इतर देशांच्या तुलनेमध्ये आपल्या देशात पावसाचं पाणी मुबलक प्रमाणात मिळविण्यासाठी गावागावांमधून होणारे तंटे, दोन राज्यांमध्ये, विभागांमध्ये विवाद आपल्या परिचयाचेच आहेत. पाण्याच्या वाढत्या मागणीमुळे आरोग्यावर होणारे परिणाम या संदर्भात जागरुकता निर्माण करण्याची गरज आहे. पाणीटंचाई समस्येवर मात करण्यासाठी आपण पाण्याचे पुनर्चक्रीकरण करणे आणि पाण्याचा अपव्यय टाळणे आवश्यक आहे. पाणीटंचाईची समस्या ही पाण्याच्या स्त्रोतांचा नियोजनबध्द वापर न केल्यामुळेच निर्माण होते. ही बाब आपण लक्षात घेतली पाहिजे.

भारतात दरवर्षी सुमारे १०० तास पाऊस पडतो. हे पाणी साठवणे आणि जास्तीतजास्त पाणी जमिनीमध्ये मुरवले तर देशातला पाणीप्रश्न निश्चितपणे सुटू शकतो. त्यासाठी आपण प्रत्येकाने पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे महत्व ओळखून पाणी वाया जाऊ नये, यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. याचाच एक भाग म्हणून शालेय जीवनापासूनच पाण्याचे महत्व अधोरेखित करणारे प्रयोग, उपक्रम, प्रकल्प करण्यास विद्यार्थ्यांना उद्युक्त करणे गरजेचे आहे. याची सुरुवात स्वतःच्या घरापासून करायला हवी. आपण प्रत्येकजण दररोज वेगवेगळ्या क्रियांसाठी पाण्याचा वापर करीत असतो. एका दिवसात वेगवेगळ्या कारणांसाठी आपण किती पाणी वापरतो? आपल्या घरामध्ये दररोज किती पाण्याचा वापर होतो? हा वापर करीत असताना पाणी वाया जाते का? पाण्याचा अपव्यय टाळणे शक्य आहे का? अशा सगळ्या बाबींचा लेखजोखा आपण प्रकल्पाच्या माध्यतातून घेऊ शकतो. ज्याप्रमाणे आर्थिक व्यवहाराचे ऑडीट (अंकेक्षण) केले जावे, त्याचप्रमाणे हे वॉटर ऑडिट (जल अंकेक्षण) करणे आवश्यक आहे.

*संदर्भ:*

१. घोरपडे अभिजित, (२०१३), दुष्काळाला आवतन, दैनिक लोकसत्ता.
२. देसरडा एच.एम., (२०१४), दुष्काळ निर्मूलनाची गुरुकिल्ली, दैनिक लोकसत्ता.
३. यादव योगेंद्र, (२०१४), अवर्षण : अस्माणी दुष्काळाची सुलतानी, दैनिक लोकसत्ता.
४. चितळे माधवराव, (२०१३), पाण्याचे मुल्यानुसारच नियोजन करावे, दैनिक लोकसत्ता.
५. पवार पोपटराव, (२०१४) दुष्काळ २०१४ ची राजकीय दिशा ठरवेल, दैनिक लोकसत्ता.
६. मोरे दि. मा., (२०१३), जिथे उसच उस तिथेच पिण्यासाठी टॅंकर, दैनिक लोकसत्ता.



LECTURER
ART'S COMM. & SCI. COLLEGE
Shankarnagar, Tq, Biloli
Dist. Nanded.